निशानी क्र.५ खालील आदेश

(दिनांक २/०८/२०२३)

प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ व कलम १५१ अन्वये प्रतिवादींविरुध्द तात्पूरते मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत दाव्यातील वाद विषय हा मौजा म्हसाळा , प.ह.नं.३३, तह.उमरेड, जि. नागपूर येथील शेत जमीन नवीन गट नं.४४ ही असुन त्याचे संपुर्ण वर्णन अर्जातील परिच्छेद क्र. ३ मध्ये तसेच दाव्या सोबत जोडलेल्या परिशिष्टमध्ये नमुद केले आहे. (येथुन पुढे संक्षिप्ततेकरिता 'दावा मिळकत' असे संबोधले आहे.)

३. **वादीचे कथन थोडक्यात खालील प्रमाणेः-**

प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे वाटेहिस्से होउन विभक्त कब्जा मिळणेकरिता तसेच, घोषणा व मनाईहुकुम होण्याकरिता दाखल केला आहे.

४. वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे सख्खे भाउ बहीण आहेत. मयत गंगाराम किसन सोनारकर हे वादी व प्रतिवादी यांचे वडील आहेत. मयत गंगाराम याची मौजा कोलार, प.ह.नं.७४ येथील सर्वे नं. २०१/१ आराजी ९.२९ एकर अशी वडीलोपार्जित शेती होती. सदर शेतीची मयत गंगाराम हा वाहीजुपी करुन उत्पन्न घेत होता व आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करित होता. सदर शेतीच्या उत्पन्नातुन त्याने वर नमुद दावा मिळकत दिनांक ०९.०६.१९६७ रोजी गंगाधर गोविंदराव आनदेव यांच्या कडुन खरेदी केली होती. सदर शेती ही वडीलोपार्जित उत्पन्नातुन खरेदी केल्यामुळे ती वडीलोपार्जित शेती आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी हे सदर शेतीचे सह मालक आहेत. गंगाराम किसन सोनारकर मयत झाल्यावर पटवारी रेकॉर्डला

वादी व प्रतिवादी यांचे वारसान म्हणुन नाव दर्ज झाले. वादी व प्रतिवादी यांचे वडील मयत गंगाराम हे अशिक्षित व म्हातारे होते. त्याचा गैरफायदा घेउन प्रतिवादी क्र. १ व २ यांनी संगनमत करुन वादी यांचा हिस्सा डावलण्यासाठी बनावटी व बेकायदेशीर मृत्युपत्र तयार करुन घेतले. सदर दस्ताच्या आधारावर प्रतिवादी क्र. १ याने वादी यांच्या विरुध्द उपविभागीय अधिकारी, उमरेड यांच्या कार्यालयात राजस्व अपील क्र. ४६/आर.टी.एस. ५९/२०२०-२०२१ वादीच्या नावाने असलेला फेरफार रद्द करण्यासाठी दाखल केले होते. त्यावेळी वादींना सदर तथाकथित मृत्युपत्र माहित झाले. दिनांक २४.०१.२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी, उमरेड यांनी आदेश पारित करुन वादीच्या नावाने असलेला फेरफार रद्द केला. त्यामुळे दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावे झाली आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीची विल्हेवाट लावुन त्रयस्त व्यक्तिला हस्तांतरीत करु शकतात. सबब,वादीने दावा मिळकतीचे वाटणी हिस्से करुन स्वतंत्र कब्जा मिळण्याकरिता दावा दाखल केला आहे. दाव्याचा निकाल लागे पावेतो प्रतिवादींनी दावा मिळकत कोणालाही विकु नये तसेच, दावा मिळकतीची कोणत्याही प्रकारे विल्लेवाट लावु नये याकरिता तात्पुरता मनाई हुकुम मिळण्याची विनंती केली आहे.

५. वादीने त्याच्या अर्जातील कथनाच्या समर्थनार्थ खालील प्रमाणे दस्ताऐवजे दाखल केली आहेत.

१. मौजा कोलार प.ह.नं.७५, गट नं.२०१/२ चे विक्रीपत्र
२. दावा मिळकत गट नं. ४४ चा ७/१२ उतारा व गाव नमुना ८अ उतारा
३. दावा मिळकतीची फेरफार पंजी
४. उपविभागीय अधिकारी यांनी दि. २४.१.२०२२ रोजी पारित केलेला आदेश.

६. प्रतिवादी क्र.१ याने हजर होउन प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे नि.क्र.२१ वर सादर केले आहे. सदर प्रतिवादी क्र.१ याने वादीशी असलेले नाते तसेच दावा मिळकतीचे वर्णन मान्य केले आहे. प्रतिवादी क्र. १ हयाच्या म्हणण्यानुसार, सत्यभामा गुणाजी मानकर ही मयत गंगाराम याची बहीण होती. तिचा मृत्यु झाला आहे. परंतु तिच्या वारसाना वादीने दाव्यात जोडले नसल्यामुळे नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीचा दोष निर्माण झाला आहे. वादीने मौजा कोलार येथील शेत सर्वे नं. २०१/२ चे मयत गंगाराम याने करुन दिलेले तथाकथीत विक्रिपत्र दाखल केले आहे. सदर विक्रीपत्र हे दिनांक २९.०५.१९६८ रोजी करुन दिल्याचे दिसते. वादीने सदर विक्रीपत्र आव्हानीत केले नाही व त्यामध्ये हिस्सा मागीतलेला नाही. वादीने सदर मालमत्ता दाव्यात जोडली नाही तसेच, खरेदीदार मयत उध्दव सोनारखन याच्या वारसाना दाव्यात जोडले नाही.त्यामुळे पार्शल पार्टीशन व नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीचा दोष निर्माण झाला आहे. वादीचा दावा हा मुदत बाहय आहे. त्यामुळे तो खारीज होण्यास पात्र आहे. दावा मिळकत ही मयत गंगाराम याची स्वःकष्टार्जीत कब्जे मालकीची आहे. मयत गंगारामच्या पत्नीचा देखील मृत्यु झाला आहे. मयत गंगाराम याने दावा विक्रीचे मृत्युपत्र प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या हक्कात करुन ठेवले आहे. त्यामुळे दावा मिळकतीच्या पश्चिमेकडील भागातील १.४९ हे.आर. ही प्रतिवादी क्र. २ याला तर पुर्वेकडील भाग १.५० हे.आर.प्रतिवादी क्र. १ याला मृत्युपत्रान्वये देण्यात आली आहे. मयत गंगाराम याने त्याच्या हयातीत दिनांक ०७.०७.२०१६ रोजी लेखी स्वरुपात लिहुन ठेवले असुन ते दुयम निबंधक कार्यालय, उमरेड येथे साक्षीदारांसमक्ष पंजीबध्द करुन ठेवले आहे. त्यावेळी मयत गंगाराम याची मानसिक व शारीरीक स्थिती उत्तम होती. सदर मृत्युपत्र हे कायदेशीर आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ व २ हेच दावा मिळकतीचे कब्जे दार व मुळ मालक आहेत. सदर मृत्युपत्राच्या आधारे ७/१२ उता-यावर

तलाठी यांनी ज्याचे नावाने मृत्युपत्र करुन दिले त्या व्यतिरिक्त वारस यांचे पत्ते देण्यास नकार दिला करिता ७/१२ उता-यावर विभक्त नोंद नामंजूर केली. त्यानंतर पटवारी व मंडळ अधिकारी यांनी आपसात संगनमत करुन दिनांक २६.०३.२०१९ रोजी फेरफार क्रमांक ३८९ प्रमाणे वादी व प्रतिवादी यांची नावे वारस हक्काने ७/१२ उता-यावर बेकायदेशीरपणे दर्ज केली. सदर फेरफाराविरुध्द प्रतिवादी क्र. १ याने उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले होते. सदर अपीलातील आदेशानुसार फेरफार क्र. ३८९ रद्द करण्यात आला. त्यामुळे दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यावर मृत्युपत्रानुसार प्रतिवादी क्र. १ व २ यांची नावे दर्ज झाली आहेत. प्रतिवादी क्र. १ व २ यांची दावा मिळकतीवर विभक्त कब्जे वहिवाट सुरु आहे. वादींना दावा मिळकतीत हिस्सा मागण्याचा कायदेशीर अधिकार नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

७. प्रतिवादी क्र. १ याने खालील दस्तऐवजांवर विश्वास ठेवला आहे.

१. दिनांक ७.०७.२०१६ रोजीचे मृत्युपत्र
२. गट नं. ४४ चा ७/१२ उतारा व गाव नमुना ८-अ
३. फेरफार पत्रक
४.कार्यकारी दंडाधिकारी उमरेड यांच्याकडे केलेला अर्ज

८. प्रतिवादी क्र. २ याने निशानी क्र. १२ वर आपले म्हणणे सादर केले आहे. त्याने वादींशी असलेले नाते मान्य केले आहे. तसेच, दावा मिळकत ही वडीलोपार्जित शेतीच्या उत्पन्नातुन त्यांचे वडील गंगाराम यांनी खरेदी केली असल्याचे देखील मान्य केले आहे. प्रतिवादी क्र. २ याच्या म्हणण्यानुसार त्याचे वडील मयत गंगाराम हे प्रतिवादी क्र. १ याच्या कडे राहत असताना तो त्यांना अतिशय त्रास देत असल्यामुळे ते वादी क्र.१ व २

यांच्याकडे राहत होते. सन २०१६ मध्ये प्रतिवादी क्र. १ हा वडील गंगाराम यांना औषधोपचारा निमित्त नागपूरला घेउन गेला. त्यावेळी त्यांची तब्येत अत्यंत खराब होती. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. २ याला काही माहिती न देता दिनांक ०७.०७.२०१६ रोजी प्रतिवादी क्र. १ याने वडीलांकडुन मृत्युपत्राचा लेख करुन घेतल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येते.सदर मृत्युपत्र हे बेकायदेशीर आहे. दावा मिळकत ही वडीलोपार्जित आहे त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचा समान हिस्सा आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यास त्याची काही हरकत नाही.

९. वादी व प्रतिवादीच्या कथनांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित झाले असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे आहेत.

अनु. क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१	वादी हा सकृतदर्शनी केस सिध्द करतो काय ?	होकारार्थी
२	न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे वादी सिध्द करतो काय ?	होकारार्थी
३	तात्पुरता मनाई अर्ज मंजूर झाल्यास कोणाचे न भरुन येणारे नुकसान होईल ?	वादीचे
४	आदेश काय ?	अंतीम आदेशा प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दे क्र. १ ते ३ करिताः</u>

१०. मुद्दे क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्या कारणाने वारंवारंता टाळण्याकरिता एकत्रीत विचारात घेण्यात येत आहेत.

११. वादी व प्रतिवादींच्या विधीज्ञांच्या युक्तीवाद ऐकला. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचे काळजीपुर्वक अवलोकन केले.

१२. वादीने प्रस्तुत दावा हा दावा मिळकतीची वाटणी होउन स्वतंत्र कब्जा मिळण्याकरिता दाखल केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, दावा मिळकत ही मौजा कोलार येथील त्यांचे वडील मयत गंगाराम याच्या वडीलोपार्जित शेतजमिनीच्या उत्पन्नातुन खरेदी केली आहे. सदर दावा मिळकत ही वडीलोपार्जित असुन त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचा प्रत्येकी १/४ हिस्सा आहे. परंतु वादीचा हक्क डावलण्या करिता प्रतिवादी क्र. १ याने बेकायदेशीर, बनावट मृत्यपत्र वडीलांकडुन करुन घेतले आहे. सदर मृत्युपत्रास वादीने आव्हान केले आहे. वादीच्या कथनांना प्रतिवादी क्र. २ याने समर्थन दिले आहे. त्यामुळे दावा मिळकत ही वडीलोपार्जित असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. प्रतिवादी क्र. १ याने घेतलेला आक्षेपा करिता दावा गुणदोषांवर चालविल्यावर खरी परिस्थिती समोर येईल. प्रतिवादी क्र. १ व २ हे दावा मिळकतीच्या कब्जे वहीवाटीत आहेत. उपविभागीय अधिकारी, उमरेड यांच्या आदेशान्वये दावा मिळकतीवर वारस म्हणुन वादी व प्रतिवादी यांच्या नावाने झालेला फेरफार रद्द करण्यात आला आहे. सबब, प्रतिवादी हे सदर दावा मिळकतीवर आपला मालकी हक्क दाखवुन त्याची विल्हेवाट लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. दावा मिळकत हा दाव्याचा विषय असल्यामुळे दाव्याचा निकाल लागत नाही तो पर्यंत तिची विल्हेवाट लागणार नाही याकरिता त्याबाबत आदेश पारित करणे अत्यावश्यक आहे. न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने झुकत असुन अर्ज मंजूर न केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. सबब वर नमुद कारणास्तव मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी देउन मुद्दा क्र. ४ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी स्वतः किंवा इतरांमार्फत दावा मिळकत ही प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागे पावेतो कोणालाही विक्री करु नये किंवा त्यामध्ये कोणत्याही त्रयस्त व्यक्तीचे हितसंबंध प्रस्तापित करु नये किंवा दावा मिळकत अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करुन नये असा तात्पुरता मनाई हुकुम देण्यात येत आहे.

३. अर्जाचा खर्च दोन्ही पक्षांनी आपापला सोसावा.

JAHEDA MOHMED MISTRY
order
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2023.09.04 13:41:45 +0530

(जा.म.मिस्त्री)

दिनांकः २/०८/२०२३ सह दिवाणी न्यायाधीर क.स्तर,
उमरेड